# आकाशवाणी पुणे
# प्रादेशिक वृत्त विभाग
# प्रादेशिक बातमीपत्र
# सकाळी 07 वाजून 10 मि

**दिनांकः26.06.2024** **वारःबुधवार**

---

1) लोकसभेच्या सभापतीपदासाठी आज निवडणूक; राष्ट्रीय लोकशाही आघाडीतर्फे ओम बिर्ला तर विरोधकांकडून काँग्रेसचे के. सुरेश रिंगणात
2) लोकसभेच्या विरोधी पक्षनेतेपदी कॉंग्रेस खासदार राहुल गांधी यांच्या नावावर शिक्कामोर्तब
3) विधानपरिषदेच्या शिक्षक आणि पदवीधर मतदारसंघांच्या 4 जागांसाठी मतदानाला प्रारंभ
4) अल्पभूधारक शेतकऱ्यांना पीक कर्ज देताना हात आखडता न घेण्याचं मुख्यमंत्र्यांचं बँकांना आवाहन
5) पुणे पोर्शे अपघात प्रकरणातल्या अल्पवयीन आरोपीची बालसुधारगृहातून तत्काळ सुटका करण्याचे मुंबई उच्च न्यायालयाचे आदेश आणि
6) टी 20 विश्वचषक स्पर्धेच्या उपांत्य फेरीत भारत-इंग्लंड आणि दक्षिण आफ्रिका-अफगाणिस्तान आमने सामने

**लोकसभा**

लोकसभेच्या सभापतीपदासाठी आज निवडणूक होणार आहे. राष्ट्रीय लोकशाही आघाडीनं लोकसभेच्या सभापतीपदासाठी ओम बिर्ला यांना पुन्हा संधी दिली आहे. त्यांनी काल सभापतीपदासाठी अर्ज भरला. तर विरोधकांकडून काँग्रेसचे खासदार के. सुरेश यांनी उमेदवारी अर्ज भरला आहे. लोकसभेच्या सभापतींची निवड एकमतानं आणि बिनविरोध व्हायला हवी असं संसदीय कार्य मंत्री किरेन रिजीजू यांनी म्हटलं आहे.

दरम्यान लोकसभा अधिवेशनाच्या कालच्या दुसऱ्या दिवशीही अनेक खासदारांनी सभागृहाच्या सदस्यत्वाची शपथ घेतली. राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षाच्या खासदार सुप्रिया सुळे, अमोल कोल्हे, शिवसेनेचे श्रीकांत शिंदे, शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्षाचे अरविंद सावंत, भाजपाचे नारायण राणे यांनी सदस्यत्वाची शपथ घेतली. राष्ट्रवादी काँग्रेसच्या नवनिर्वाचित राज्यसभा सदस्य सुनेत्रा पवार यांनी काल सदस्यत्वाची शपथ घेतली. उपराष्ट्रपती आणि राज्यसभेचे अध्यक्ष जगदीप धनखड यांनी त्यांना शपथ दिली.

लोकसभेच्या विरोधी पक्षनेतेपदासाठी राहुल गांधींच्या नावावर शिक्कामोर्तब करण्यात आलं आहे. काँग्रेस नेते के.सी. वेणूगोपाल यांनी काल माध्यमांशी बोलताना याबाबत माहिती दिली. काँग्रेस संसदीय पक्षाच्या नेत्या सोनिया गांधी यांनी हंगामी सभापती भर्तृहरी महताब यांना पत्र लिहून, राहुल गांधी लोकसभेचे विरोधी पक्षनेते असतील, अशी माहिती दिल्याचं वेणूगोपाल म्हणाले. दरम्यान भारतीय जनता पार्टीचे विद्यमान अध्यक्ष जे. पी. नड्डा यांची राज्यसभेचे सभागृह नेते म्हणून तर कॉंग्रेस अध्यक्ष मल्लिकार्जुन खरगे यांची राज्यसभेतील विरोधी पक्षनेते म्हणून या आधीच निवड करण्यात आली आहे.

**विधानपरिषद शिक्षक**

विधानपरिषदेच्या मुंबई आणि कोकण पदवीधर तसंच नाशिक आणि मुंबई शिक्षक मतदारसंघांसाठी आज मतदान होत आहे. सकाळी 7 वाजल्या पासून मतदानाला सुरुवात झाली असून संध्याकाळी 6 वाजेपर्यंत हे मतदान होईल. याची मोजणी 1 जुलैला होणार आहे. मुंबई पदवीधर मतदारसंघात 8, कोकण पदवीधरमध्ये 13, नाशिक शिक्षकमध्ये 21 तर मुंबई शिक्षक मतदारसंघात 13 उमेदवार रिंगणात आहेत.

**<u>विधानपरिषद</u>**

विधान परिषदेच्या रिक्त होणाऱ्या 11 जागांसाठी अर्ज भरायला कालपासून सुरुवात झाली. या निवडणुकीसाठी 2 जुलै रोजी दुपारी 4 वाजेपर्यंत उमेदवारी अर्ज सादर करता येतील 3 जुलै रोजी अर्जांची छाननी होईल. उमेदवारी अर्ज मागे घेण्याची मुदत 5 जुलैपर्यंत आहे. 12 जुलै रोजी सकाळी 9 ते दुपारी 4 या वेळात मतदान होईल.

**<u>शेतकरी कर्ज</u>**

अल्प, अत्यल्पभूधारक शेतकऱ्यांना पीक कर्ज देताना बँकानी हात आखडता घेऊ नये असं आवाहन मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी काल केलं. राज्यस्तरीय बँकर्स समितीच्या 163 व्या बैठकीत ते बोलत होते. शासन शेतकऱ्यांच्या पाठीशी खंबीरपणे उभं आहे. बँकानीही शेतकऱ्यांना अडचणीच्या काळात पाठबळ दिलं पाहिजे, असं मुख्यमंत्री म्हणाले. राज्यातील जिल्हा सहकारी बँका तसंच प्राथमिक कृषी पतपुरवठा संस्थांच्या बळकटीकरणाला प्राधान्य दिलं जावे, असा निर्णय या बैठकीत घेण्यात आला. उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, उपमुख्यमंत्री अजित पवार, यांच्यासह विविध मंत्री अधिकारी यावेळी उपस्थित होते.

**<u>मुख्यमंत्री खरीप आढावा</u>**

राज्यातील शेतकरी आणि नागरिकांना नैसर्गिक आपत्ती तसंच शेती नुकसान भरपाईसाठीच्या मदतीचं वाटप 30 जूनपर्यंत पूर्ण करण्याचे निर्देश मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी काल दिले. राज्याच्या खरीप हंगाम आढावा बैठकीत ते बोलत होते. बनावट खतं, बियाण्याची विक्री करणाऱ्या विक्रेत्यांसह कंपन्यावरही कडक कारवाई करण्याच्या सूचना यावेळी मुख्यमंत्र्यांनी कृषी विभागाला दिल्या.

**<u>दिव्यांग वारी-यवतमाळ</u>**

पंढरपूरला विठूरायाच्या दर्शनासाठी प्रथमच दिव्यांगांची स्वतंत्र दिंडी निघाली आहे. संत सुरदासांच्या पादुका आणि प्रतिमा पालखीत घेऊन यवतमाळहून निघालेल्या या दिंडीमध्ये मोठ्या संख्येनं दृष्टिहीन वारकरी आहेत. आर्णी, दिग्रस, पुसद, कळमनुरी, परभणी, परळी, अंबेजागाई, कुर्डूवाडी, पंढरपूर असा 521 किलोमीटरचा प्रवास पायी करत ही वारी आषाढी एकादशीला पंढरपूरला पोहोचणार आहे. कालच्या अंगारकी चतुर्थीच्या मुहूर्तावर या दिंडीनं पंढरपूरकडे प्रस्थान ठेवलं. यावेळी दिव्यांग संघाचे अध्यक्ष प्रवीण कंठाळे यांनी आपल्या भावना व्यक्त केल्या.......

सेवा समर्पण वारीचे अध्यक्ष प्रशांत बनगीनवार या उपक्रमाबाबत बोलताना म्हणाले

**<u>शाहू महाराज जयंती-कोल्हापूर,मुंबई</u>**

राजर्षी छत्रपती शाहू महाराजांच्या 150 व्या जयंतीनिमित्त आज राज्यात ठिकठिकाणी विविध कार्यक्रमांचं आयोजन करण्यात आलं आहे. कोल्हापूरमध्ये भव्य शोभयात्रेचं आयोजन करण्यात आलं असून जिल्ह्याचे पालकमंत्री हसन मुशरीफ यांच्या हस्ते शोभयात्रेचा प्रारंभ होईल. राष्ट्रवादी काँग्रेस विविध उपक्रमांच्या माध्यमातून राजर्षि शाहू महाराजांची जयंती राज्यभर साजरी करणार असल्याची माहिती प्रदेशाध्यक्ष खासदार सुनिल तटकरे यांनी प्रसिद्धी पत्रकाद्वारे दिली आहे.

**<u>सिंबोयसिस पदवीप्रदान</u>**

उच्चशिक्षित, पदवीधरांनी नोकरीच्या मागे न लागता नवोन्मेषक, उद्योजक, व्यावसायिक नेतृत्व आणि स्टार्टअप निर्माते बनावं, असं आवाहन राज्यपाल रमेश बैस यांनी काल पुण्यात केलं. लवळे इथल्या सिम्बायोसिस

आंतरराष्ट्रीय विद्यापीठात आंतरराष्ट्रीय विद्यार्थ्यांच्या पदवीप्रदान सोहळ्यात राज्यपाल प्रमुख पाहुणे म्हणून बोलत होते.

**बालगंधर्व**

मुंबईतलं शिवाजी मंदिर, ठाण्यातलं गडकरी रंगायतन आणि पुण्यातलं बालगंधर्व रंगमंदिर या ठिकाणी जसा नाटकाचा प्रयोग रंगतो तसा कुठेच रंगत नाही, अशा शब्दात ज्येष्ठ अभिनेत्री उषा नाडकर्णी यांनी आपल्या भावना काल व्यक्त केल्या. पुण्यातील बालगंधर्व रंगमंदिरांच्या 56व्या वर्धापन दिनानिमित्त बालगंधर्व परिवाराच्या वतीने देण्यात येणारा जीवन गौरव पुरस्कार नाडकर्णी यांना प्रदान करण्यात आला, त्यावेळी त्या बोलत होत्या. यावेळी नाट्य क्षेत्रातील योगदानासाठी विविध मान्यवरांना पुरस्कार देण्यात आले.

**पोर्शे कार**

पुण्यातील पोर्शे अपघात प्रकरणी अल्पवयीन आरोपीची तात्काळ सुटका करण्याचे आदेश मुंबई उच्च न्यायालयानं काल दिले. न्यायमूर्ती भारती डांगरे आणि न्यायमूर्ती मंजूषा देशपांडे यांच्या खंडापीठानं हे आदेश दिले. या प्रकरणातील अल्पवयीन आरोपीला कोर्टानं जामीन मंजूर केला असला तरीही या प्रकरणातील दोषींवर कारवाई करणारच असं मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी सांगितलं. या अपघातात मृत्यूमुखी पडलेल्या तरुण आणि तरुणीच्या पालकांना राज्य शासनाकडून 10 लाख रुपयांचा धनादेश काल देण्यात आला.

**क्रिकेट**

टी-ट्वेंटी विश्वचषक स्पर्धेच्या उपांत्य फेरीत भारत, इंग्लंड, दक्षिण आफ्रिका आणि अफगाणिस्तान हे संघ पोहोचले आहे. काल झालेल्या सामन्यात डकवर्थ लुईस पद्धतीनुसार अफगाणिस्ताननं बांग्लादेशला 8 धावांनी पराभूत केलं. त्यामुळं अफगाणिस्तान उपांत्य फेरीत पोहोचला आणि उपांत्य फेरीत जाण्याचं ऑस्ट्रेलियाचं स्वप्न भंगलं.

**हवामान**

कोकण आणि मध्य महाराष्ट्राचा घाट प्रदेशात मुसळधार ते अति मुसळधार पावसाचा इशारा हवामान विभागानं दिला आहे. विदर्भात असाच इशारा वीजा आणि जोराचे वारे यांच्यासह देण्यात आला आहे.

# आकाशवाणी पुणे केंद्रावरचं प्रादेशिक बातमीपत्र संपलं. नमस्कार